| CNR No.MHKO200001652022 | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | दाखल तारीख | – | ०६ | ०५ | २०२२ |
| | नोंदणी तारीख | – | ०६ | ०५ | २०२२ |
| | निकाल तारीख | – | १२ | ०५ | २०२६ |
| | कालावधी | | वर्ष | महिने | दिवस |
| | | | ०४ | ०० | ०६ |

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कळे–खेरीवडे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर**
**यांचे न्यायालयात ( पिठासीन अधिकारी व्ही.ए.लावंड–कोकाटे**

**संक्षिप्त फौजदारी खटला क्रं.४८/२०२२**
**न्यायनिर्णय नि.क्र.६ सोबत**
**न्यायनिर्णय घोषीत दिनांक १२ मे २०२६**

कळे पोलीस ठाणे, गुन्हा नोंद क्रं.१९/२०२२ भारतीय दंड संहिता कलम ३०४(अ), २७९, ३३८ सह मोटार वाहन कायदा कलम १८४, १३४(अ)(ब), २२३/१७७ प्रमाणे

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी/तक्रारदार | | महाराष्ट्र शासन,<br>मार्फत पोलीस निरीक्षक,<br>कळे पोलीस ठाणे, ता.पन्हाळा,<br>जि.कोल्हापूर |
| अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता | | ॲड. श्री. पी.एच.सावंत |
| आरोपी | | प्रदीप उर्फ बंडा धोंडीराम देसाई, व.व.३६,<br>रा. घरपणे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर. |
| आरोपी तर्फे वकील | | ॲड. श्री. व्ही. एस. पाटील |

**भाग–ब**
**(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४(ii) अन्वये)**

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | :– | १४.०३.२०२२ |
| फिर्याद दाखल दिनांक | :– | १५.०३.२०२२ |
| दोषारोपपत्र पाठविल्याचा दिनांक | :– | ०६.०५.२०२२ |

| | | |
|---|---|---|
| प्ली निश्चित केल्याचा दिनांक | :- | १३.०७.२०२२ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | :- | १३.०६.२०२४ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | :- | -- |
| न्यायनिर्णय दिनांक | :- | १२.०५.२०२६ |
| न्यायनिर्णय शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | :- | - |

**आरोपीची माहिती**

| आरोपी क्रं. | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जामिनावर सोडल्याचा दिनांक | गुन्हयाचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ अन्वये समायेजित (Set off) करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | प्रदीप उर्फ बंडा धोंडीराम देसाई | फौ.प्र.सं. कलम ४१(१)(अ) प्रमाणे नोटीस | १५.०३.२०२२ | भा.दं.वि. कलम ३०४(अ), २७९, ३३८ सह मोटार वाहन कायदा कलम १८४, १३४(अ)(ब), २२३/१७७ प्रमाणे | निर्दोष मुक्त | -- | -- |

## <u>भाग-क</u>

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४(iii) अन्वये)

**सरकार पक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/बचाव पक्षातर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार**

**अ. अभियोग पक्ष**

| सा.क्रं. | साक्षीदारांचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| १. | पंकज बबन गुरव | फिर्यादी | ६ |
| २. | अर्जुन विठ्ठल मोळे | घटनास्थळ पंच | ६ |
| ३. | अजित महादेव गुरव | साक्षीदार | ६ |

**ब. बचाव पक्ष**

| सा.क्रं. | साक्षीदारांचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| -- | निरंक | -- | -- |

**क. न्यायालयामार्फत**

| सा.क्रं. | साक्षीदारांचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| -- | निरंक | -- | -- |

## अभियोगपक्षातर्फे/बचावपक्षातर्फे/न्यायालयातर्फे कागदपत्रांना देण्यात आलेल्या निशाणी

**अ.अभियोग पक्षामार्फत निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)**

| अ.क्रं. | निशाणी क्रं. | वर्णन |
|---|---|---|
| १. | १४ | फिर्याद |
| २. | १७ | घटनास्थळ पंचनामा |
| ३. | आर्टीकल अ | घटनास्थळावरील फोटो रंगीत प्रत |
| ४. | २४ | प्रोव्हीजलन पोस्ट-मार्टम रिपोर्ट कम मेडीकल सर्टिफिकेट ऑफ कॉज ऑफ डेथ (आरोपीतर्फे मान्य) |

**ब. बचाव पक्षामार्फत निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)**

| अ.क्रं. | निशाणी क्रं. | वर्णन |
|---|---|---|
| १. | २३ | मुळ फिर्यादी व आरोपीतर्फे तडजोडीस परवानगी अर्ज |
| २. | २५ | मुळ फिर्यादी व आरोपीतर्फे केस निकाली करणेबाबत पुरसीस |

**क. न्यायालयामार्फत निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)**

| अ.क्रं. | निशाणी क्रं. | वर्णन |
|---|---|---|
| १. | १ | दोषारोपपत्र |
| २. | ६ | प्ली |
| ३. | ६ | आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम |

| | | |
|---|---|---|
| | | ३१३(१)(ब) प्रमाणे निवेदन |

**ड. मुद्देमालाचे विवरण**

| मालमत्तेचे वर्णन | निशाण क्र. | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | -- | -- |

**न्या य नि र्ण य**
**(दिनांक – १२ मे २०२६ रोजी घोषित)**

आरोपीविरुध्द भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३०४(अ),२७९,३३८ सह मोटार वाहन कायदा कलम १८४, १३४(अ)(ब),२२३/१७७ अन्वये शिक्षापात्र गुन्हा केल्याची संपरिक्षा झालेली आहे.

**०२.** अभियोगपक्षाची थोडक्यात हकीकत अशी की, फिर्यादी घरपण, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर येथे त्याचे आई–वडील व भाऊ असे राहणेस आहेत. फिर्यादी यांच्या घरामध्ये फिर्यादीचा चुलत भाऊ अजित महादेव गुरव हा त्याचे आई–वडिल, पत्नी व त्याची लहान मुलगी भक्ती उर्फ सई अजित गुरव वय १ वर्ष ११ महिने यांचेसह एकत्रीत राहणेस आहेत. फिर्यादी यांचे घरपण गावातील गुरव गल्लीत व्यंकटेश्वरा दुध संस्था आहे. या संस्थेमध्ये संकलन झालेले दुध नेणेसाठी गावातीलच प्रदीप उर्फ बंडा धोंडीराम देसाई याचा टाटा कंपनीचा ४०७ टेम्पो आहे. दि.१४/०३/२०२२ रोजी फिर्यादी नेहमीप्रमाणे सकाळी ०७.३० वाजता कामावर जावुन सायंकाळी ०४.३० वाजता घरी परत आला होता. फिर्यादी सायंकाळी ०६.२० वाजताचे सुमारास घराचे समोर उभा होता. त्यावेळी फिर्यादीचा चुलत भावाची मुलगी भक्ती उर्फ सई ही गल्लीत खेळत होती. त्यावेळी भक्तीची आई शितल, भक्तीची आजी संगिता व फिर्यादीची वहिनी सरिता उत्तम गुरव याही घरासमोर गल्लीत होत्या. प्रदीप उर्फ बंडा धोंडी देसाई याने त्याचे ताब्यातील टाटा ४०७ टेम्पो क्र.

एम.एच.–११–टी–००९१ हा रस्त्यच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन बेदरकारपणे व हयगयीने चालवुन व टेम्पोमध्ये बाजुस क्लीनर नसताना रिव्हर्सने पाठीमागे चालवत घेवुन जात असताना भक्ती उर्फ सई हीस धडक देवुन तिला गंभर जखमी करुन तिचे मृत्युस कारणीभुत ठरला. फिर्यादी व चुलत भाऊ निलेश गुरव असे दोघांनी भक्ती उर्फ सई हिला मोटर सायकलवरुन सी.पी.आर. हॉस्पीटल, कोल्हापूर येथे उपचाराकरीता नेले परंतु तेथील डॉक्टरांनी ती उपचारापुर्वीच मयत झाल्याचे त्यांना समक्ष सांगितले. त्यानंतर तिचे प्रेताचे पी.एम. झालेनंतर प्रेत ताबेत घेवुन धार्मिक रितीरिवाजानुसार गावी अंत्यसंस्कार केले. त्यानंतर फिर्यादी यांनी पोलीस ठाणेत तक्रार दिली.

०३. फिर्यादी यांनी दाखल केलेल्या तक्रारीवरुन आरोपीविरुध्द कळे पोलीस ठाणे, गु.र.नं.१९/२०२२ भारतीय दंड संहिता कलम ३०४(अ), २७९, ३३७, ३३८ सह मोटर वाहन कायदा कलम १८४, २२३/१७७, १३४(अ)(ब) अन्वये शिक्षापात्र गुन्हा नोंदविण्यात आला. सदर घटनेचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक पी.पी. सुर्वे यांनी केला असुन तपासिक अधिका–याने तपासादरम्यान इन्क्वेष्ट पंचनामा नोंदवला, घटनास्थळ पंचनामा नोंदवला, साक्षीदारांचे तपास टिपण्ण नोंदवले, मयताचे वैद्यकीय प्रमाणपत्र, अपघातग्रस्त वाहनांची तपासणी अहवाल व इतर कागदपत्रे प्राप्त करुन अभिलेखावर दाखल केली व केलेल्या तपासांती आरोपीविरुध्द सबळ पुरावा आल्याने न्यायालयात दोषारोपपत्र पाठविले.

०४. माझे पूर्वपिठासीन अधिकारी यांनी आरोपीस नि.क्र.६ नुसार भारतीय दंड संहिता कलम २७९, ३३८, ३०४(अ) सह मोटार वाहन कायदा कलम १८४, १३४(अ)(ब), २२३ सह कलम १७७ अन्वये शिक्षापात्र गुन्हयाचा तपशील वाचून व समजावून सांगण्यात आला असता आरोपीने गुन्हा कबूल नसल्याचे सांगितले व संपरिक्षेस सामोरे जाण्याची तयारी दर्शविली.

**०५.** अभियोगपक्षाने आरोपीविरुध्दचा दोषारोप सिध्द करण्यासाठी एकुण तीन साक्षीदारांचा साक्षीपुरावा नोंदविला असुन कांही कागदोपत्री पुराव्यांचा देखील आधार घेतला असुन त्यांचा उल्लेख पुढे विश्लेषनादरम्यान योग्य त्याठिकाणी करण्यात आला आहे. आरोपीतर्फे नि.क्र.२४ कडे प्रोव्हीजलन पोस्ट–मार्टम रिपोर्ट कम मेडीकल सर्टिफिकेट ऑफ कॉज ऑफ डेथ मान्य केले आहे. फिर्यादी व आरोपी यांनी संयुक्तीक अर्ज नि.क्र.२३ दाखल करुन न्यायालयाकडे तडजोडीस परवानगी मागितली असता सदरचा गुन्हा तडजोड पात्र नसल्याने तडजोडीस परवानगी देणेत आली नाही. तद्नंतर फिर्यादी व आरोपी यांनी संयुक्तीक पुरसीस दाखल करुन त्यानी केस आपसात मिटवली असुन तक्रार राहिली नसल्याने केस निकाली करणेचे न्यायालयास कळवले. फिर्यादी यांनी नि.क्र.२६ कडे पुरसीस दाखल करुन पुरावा संपला असल्याचे कळवले.

**०६.** दि.०६/०४/२०२६ रोजीचे नि.क्र.१ कडील आदेशाने अभियोगपक्षाचा पुरावा बंद केला. आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१)(ब) प्रमाणे निवेदन नोंदवले असता आरोपीने खोटी केस केली असा बचाव घेतला, परंतु आरोपीने त्याचे बचावापृष्ठयार्थ कोणताही साक्षीदार तपासला नाही. अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता व आरोपीचे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

**०७.** उपलब्ध पुराव्यावरुन खालील प्रश्नबिंदू विचारार्थ उपस्थित झाले असून त्यावरील निष्कर्ष त्या खालील नमूद कारणानुसार नोंदविले आहेत –

| अ.क्र | प्रश्नबिंदू | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्ष शाबीत करतात का की, दि.१४/०३/२०२० रोजी सायंकाळी ०६.२० वाजताचे सुमारास घरपण, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूरच्या हद्दीत फिर्यादीचे घरासमोर गुरव गल्ली येथे आरोपीने त्याच्या ताब्यातील टाटा ४०७ टेंम्पो | नकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| | नं.एम.एच.–११–टी.–००९१ हा मानवी जिवित धोक्यात येईल अगर अन्य व्यक्तीला दुखापत अगर नुकसान पोहचण्याचा संभव आहे इतक्या बेदरकारपणे किंवा हयगयीने, सदरचे वाहन पाठीमागे घेत असताना भक्ती उर्फ सई अजित गुरव हिचा अपघात केला व त्याद्वारे आरोपीने भारतीय दंड संहिता कलम २७९ प्रमाणे शिक्षापात्र गुन्हा केला ? | |
| २. | अभियोगपक्ष शाबीत करतात का की, वर नमुद तारीख, ठिकाण आणि वेळेस, आरोपीने त्याच्या ताब्यातील वर नमुद टाटा ४०७ टेंम्पो नं.एम.एच.–११–टी.–००९१ हे वाहन धरधाव वेगाने, बेदरकारपणे व निष्काळजीपूर्वक रस्त्याचे परिस्थितीकडे व रहदारीकडे दुर्लक्ष करुन वाहन पाठीमागे घेत असताना भक्ती उर्फ सई अजित गुरव हिचे गंभीर दुखापतीस कारणीभूत झालात व त्याद्वारे आरोपीने भारतीय दंड सहिंता कलम ३३८ प्रमाणे शिक्षापात्र गुन्हा केला? | नकारार्थी |
| ३. | अभियोगपक्ष शाबीत करतात का की, वर नमुद तारीख, ठिकाण आणि वेळेस, आरोपीने त्याच्या ताब्यातील वर नमुद टाटा ४०७ टेंम्पो नं.एम.एच.–११–टी.–००९१ हा मानवी जीवित धोक्यात येईल अगर अन्य व्यक्तीला दुखापत अगर नुकसान पोहचण्याचा संभव आहे इतक्या बेदरकारपणे किंवा हयगयीने चालवुन भक्ती उर्फ सई अजित गुरव हिचे मृत्युस कारणीभुत झालात व त्याद्वारे आरोपीने भारतीय दंड सहिंता कलम ३०४(अ) प्रमाणे शिक्षापात्र गुन्हा केला? | नकारार्थी |
| ३. | अभियोगपक्ष शाबीत करतात का की, वर नमुद तारीख, ठिकाण आणि वेळेस, टाटा ४०७ टेंम्पो नं.एम.एच.–११–टी.–००९१ हा जनतेस धोकादायक ठरेल अशा वेगाने किंवा अशा रितीने चालवुन व अपघात केला व त्याद्वारे आरोपीने मोटार वाहन कायदा कलम १८४ प्रमाणे शिक्षापात्र गुन्हा केला? | नकारार्थी |
| ४. | अभियोगपक्ष शाबीत करतात का की, वर नमुद तारीख, ठिकाण आणि वेळेस, टाटा ४०७ टेंम्पो नं.एम.एच.– | |

| | | |
|---|---|---|
| | ११–टी.–००९१ हा भरधाव वेगाने, बेदरकारपणे व निष्काळजीपूर्वक रस्त्याचे परिस्थितीकडे व रहदारीकडे दुर्लक्ष करुन चालवुन अपघात करुन आरोपीने पोलीसांना अपघताची खबर न देता व जखमीला वैद्यकीय मदत न देता तेथुन पळुन गेलात व त्याद्वारे आरोपीने मोटार वाहन कायदा कलम १३४(अ)(ब) प्रमाणे गुन्हा केला ? | नकारार्थी |
| ५. | अभियोगपक्ष शाबीत करतात का की, वर नमुद तारीख, ठिकाण आणि वेळेस, आरोपीने त्याचे ताब्यातील टाटा ४०७ टेंम्पो नं.एम.एच.–११–टी.–००९१ हा बेदरकारपणे व निष्काळजीपूर्वक रस्त्याचे परिस्थितीकडे व रहदारीकडे दुर्लक्ष करुन क्लीनर शिवाय वाहन मागे घेतले व त्याद्वारे आरोपीने मोटार वाहन कायदा कलम २२३ सह कलम १७७ प्रमाणे शिक्षापात्र गुन्हा केला? | नकारार्थी |
| ६. | आदेश काय ? | आरोपीची प्रस्तुत गुन्हयातुन निर्दोषमुक्तता करण्यात आली. |

## <u>का र ण मि मां सा</u>

**<u>प्रश्नबिंदू क्र. १ ते ५ करीता</u>** –

**०८.** ज्याअर्थी प्रश्नबिंदू क्र.१ ते ५ मधील नमुद अपराधासंदर्भातील वस्तुस्थिती व पुरावा हा एकमेकांशी संबंधीत आहे, त्याअर्थी या संदर्भातील विश्लेषणात्मक पुनरावृत्ती टाळण्यासाठी सदर प्रश्नबिंदूचे विश्लेषण एकत्रित केले आहे.

**०९.** आरोपीवरील आरोप सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाचा मुख्य साक्षीदार क्र. १ पंकज बबन गुरव **(फिर्यादी/नि.क्रं.६)** यांचे मौखिक पुराव्यात असे आले आहे की, अजित गुरव हे त्यांचे चुलत बंधु असून सन २०२२ मध्ये अजित गुरव यांना सई नावाची मुलगी होती. त्यावेळी तिचे वय १ वर्षे ११ महिने होते. ते तसेच त्यांची भावकी घरपण या गावात गुरव गल्लीत राहणेस आहेत. त्यांच्या गुरव

गल्लीत व्यंकटेश्वरा सहकारी दुध संस्था असून सदर संस्थेत दुध संकलनाचे काम चालते. आरोपी हा त्यांच्याच गावातील राहणारा असून त्यांच्याकडे टाटा कंपनीचे ४०७ हा टॅम्पो आहे. त्या टॅम्पोचा नंबर एम.एच. ११ टी ००९१ असा आहे. दि.१४.०३.२०२२ रोजी संध्याकाळी ६.२० मिनिटांनी आरोपी प्रदीप देसाई हे त्यांच्या व्यंकटेश्वरा सहकारी दुध संस्था या ठिकाणी दुध संकलनासाठी वर नमूद वाहनातून येत असताना सदर ठिकाणी त्यांची गाडी रिव्हर्सने येत होती. त्यावेळी ते त्यांच्या दारात उभे होते. सदर टॅम्पोने रिव्हर्स घेत असताना टॅम्पोच्या डाव्या बाजूस त्यांची पुतणी सई उर्फ भक्ती गुरव ही त्या ठिकाणी होती. सदर टॅम्पोने रिव्हर्स घेत असताना तिला डाव्या बाजूला धडक दिलेने ती खाली पडली. त्यावेळी तिला उलटी झाली व ती विवळू लागली. त्यावेळी ते व त्यांच्या घरातील इतर लोक त्या ठिकाणी पोहचले. त्यानंतर त्यांनी सईला उचलून घेतले व आरोपी प्रदीपकडे विचारणा केली की तू हे काय केलेस? त्यानंतर ते व त्यांचा चुलत भाउ निलेश गुरव असे त्या दोघांनी तिला दुचाकी वाहनावरून उपचाराकरीता सी.पी.आर. हॉस्पीटल कोल्हापूर कडे नेले. त्या ठिकाणी वैदयकीय अधिकरी यांनी त्यांना सई मृत झाल्याचे सांगितले. त्यानंतर त्यांनी सईला घरी आणल्यानंतर हिंदू धर्माप्रमाणे तिच्यावर अंत्यसंस्कार केले. त्यानंतर ते कळे पोलीस स्टेशनला येवून आरोपी विरूध्द **नि.१४** वरील फिर्याद दाखल केली.

१०. अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.२ अर्जुन विठ्ठल मोळे **(घटना स्थळ पंच/नि.क्रं.६)** यांचे मौखीक पुराव्यामध्ये असे आले आहे की, दि. १५.०३.२०२२ रोजी कळे पोलीसांनी घरपण गावातील गुरव गल्लीतील पंकज गुरव यांच्या घरासमोर पंचनामा करणेसाठी त्यांना बोलावले होते. त्यावेळी त्यांच्या सोबत पंच रघुनाथ मोळे हजर होते. घटनास्थळ त्यांना फिर्यादी पंकज गुरव यांनी दाखवले. घटनास्थळावर खडीचा रस्ता असून त्या ठिकाणी अपघात झाला होता. घटनास्थळाच्या एका बाजूला सिमेंटचे गटर्स आहेत. घटनास्थळाच्या पूर्वेस पंकज गुरव यांचे घर पश्चिमेला

सर्जेराव पाटील यांचे घर दक्षिणेला व उत्तरेला रस्ता असून पोलीसांनी त्यांच्या समक्ष घटनास्थळाचा **नि.१७** अन्वये घटनास्थळ पंचनामा नोंदविला व **आर्टिकल अ** वर दाखल असलेले फोटो काढले.

**११.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.३ अजित महादेव गुरव **(साक्षीदार/नि.क्रं.६)** यांचे मौखीक पुराव्यामध्ये असे आले आहे की, दि.१४.०३.२०२२ रोजी संध्याकाळी ६.३० च्या सुमारास कोणतीही घटना घडली नाही. त्याचबरोबर सदर घटनेमुळे त्यांना कोणीतीही जखम किंवा मारहाण झाली नाही अशा प्रकारे सदर साक्षीदाराने अभियोग पक्षास सहाय्य केले नसल्याने त्यांची साक्ष अभियोग पक्षाकरीता निरूपयोगी ठरलेली आहे.

**१२.** अशा प्रकारे उपरोक्त प्रमाणे अभियोगपक्षाच्या साक्षीदारांचा सरतपास पटलावर आला असताना सदर साक्षीदारांच्या एकूणच मौखिक पुराव्याचे मूल्यमापन करण्याकरीता त्यांचा सरतपास हा उलटतपासामध्ये देखील अबाधित राहिला आहे काय हे पाहणे आवश्यक आहे.

**१३.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.१ पंकज बबन गुरव (फिर्यादी/नि.क्रं.६) यांनी आरोपीचे विधीज्ञांनी नोंदवलेल्या उलटतपासामध्ये असे कबुल केले आहे की, घरपण गावातील मुख्य रस्ता हा मंदिराकडे गेला असून तो पूर्व–पश्चिम असा आहे. पूर्व–पश्चिम रस्त्याच्या दक्षिणेस त्यांचा गुरव गल्लीचा रस्ता आहे. गुरव गल्ली ही दक्षिणोत्तर असून त्यांचे राहते घर पश्चिमेस आहे. सदर गुरव गल्लीचा रस्ता हा व्यंकटेश्वरा सहकारी दुध संस्था या ठिकाणी जावून संपतो. सध्या त्या ठिकाणी पुढे जावून रस्ता झालेला आहे. घटनेदिवशी सायंकाळी ६.२० मिनिटांनी दुध संकलनाचे काम सूरू होते. सदर संस्थेसमोर उभारल्यास त्यांचे घर दिसते. तसेच त्यांच्या घरासमोर उभारल्यास सदर दुध संस्था दिसते. संस्थेच्या समोर वाहन वळविण्याकरीता जागा नसल्याकारणाने दुध संकलनाचा टॅम्पो मुख्य

रस्त्यापासून दूध संस्थेपर्यंत रिव्हर्स गिअरने येत होता. जवळपास २२ वर्षाच्या कालावधीमध्ये टॅम्पो चालकाकडून तसेच सदर टॅम्पो कडून कोणतीही दुर्घटना घडली नाही. मुख्य रस्त्याला लागून असलेल्या सिमेंटच्या गटारीवरून जाणे येणेकरीता ती गटर बंद केलेली नाही. सदर गटारीवरून लहान मुले किंवा वयोवृध्द लोक सहज जावू शकत नाहीत. जर टॅम्पोने सईला धडक दिली असेल तर सई टॅम्पो खाली सापडणे अपेक्षित होते. मात्र सई टॅम्पोखाली सापडली नाही. मयत सईच्या वडीलांनी मोटर वाहन प्राधिकरण कोल्हापूर यांचेकडे नुकसान भरपाईसाठी प्रकरण दाखल केलेले आहे. उर्वरीत प्रश्नांना त्यांनी नाकबूल उत्तरे नोंदविली.

**१४.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.२ अर्जुन विठ्ठल मोळे (प्रत्यक्षदर्शी/नि.क्रं.६) यांनी उलटतपासामध्ये असे कबुल केले आहे की, ते गुरव गल्लीत राहणारे असल्याने त्यांना घटनास्थळाच्या चतुःसिमा व संपुर्ण माहिती माहित आहे. फिर्यादीच्या घराच्या बाजूच्या दिशेने सदरचे सिमेंटचे गटर आहे. सुरूवातीला खडीचा रस्ता त्यानंतर सिमेंटचे गटर त्यानंतर रिकामी जागा त्यानंतर फिर्यादीचे घर आहे. त्या दिवशी ते शेतातून घरी येत असताना पोलीसांनी त्यांना बोलवून घेतले व पंचनाम्यावर सही केली. पंचनाम्यातील मजकूर ते किंवा दुसरे पंच रघुनाथ मोळे यांनी सांगितलेला नाही. तसेच पंचनाम्यातील मजकूर कोणाच्या सांगण्यावरून लिहीलेला आहे. याविषयी देखील त्यांना माहिती नाही. पोलीसांनी त्यांची तयार पंचनाम्यावर सही घेतली असून प्रत्यक्ष घटनास्थळ पंचनाम्याविषयी त्यांना माहिती नाही. केवळ पोलीसांच्या सांगण्यावरून त्यांनी घटनास्थळ पंचनाम्यावर सही केली आहे.

**१५.** अभिलेखावरील तोंडी व कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, साक्षीदार क्रं.१ फिर्यादी पंकज बबन गुरव यांनी असे मान्य केले की घटने दिवशी सायंकाळी ६.२० मिनिटांनी दुध संकलनाचे काम सुरू होते. त्यांच्या घरापासून तसेच त्यांचा चुलत भाउ अजित गुरव यांच्या घरापासून सदर दुध संस्था

अंदाजे १४० फुट अंतरावर आहे. संस्थेच्या समोर वाहन वळविण्यासाठी जागा नसल्याकारणाने दुध संकलनाचा टॅम्पो मुख्य रस्त्यापासून दूध संस्थेपर्यत रिव्हर्स गिअरने येत होता. मुख्य रस्त्याला लागून असलेल्या सिमेंटच्या गटारीवरून जाणे येणेकरीता वरून बंद केलेली नाही. धडक दिल्यानंतर सई टॅम्पो खाली सापडली नाही. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रं. २ अर्जुन विठ्ठल मोळे यांनी घटनास्थळ पंचनामा कोणत्या तारखेला नोंदविला. तसेच कोणत्या दिवशी नोंदविला याविषयी त्यांना माहिती नसल्याचे त्यांनी सांगितले. प्रत्यक्ष घटनास्थळ पंचनाम्यातील मजकूर त्यांना माहित नसून केवळ पोलीसांच्या सांगण्यावरून सही केली असल्याची बाब मान्य केली आहे.

**१६.** अभियोगपक्षाच्या पुराव्यास पृष्टी देणारा कोणताही स्वतंत्र साक्षीदाराचा साक्षीपुरावा अभिलेखावर उपलब्ध नाही. तसेच आरोपी हा घटनेच्यावेळी त्याचे ताब्यातील वाहन नेमका कशाप्रकारे चालवित होता व अपघतामध्ये त्याची चुक होती असा संशयरहित सबळ पुरावा अभिलेखावर आलेले नाही. अभिलेखावरील साक्षीदारांचा मौखिक पुरावा आरोपीने त्याचेवर दोषारोपात केलेला गुन्हा संशयापलिकडे जावुन सिध्द करणेस पुरेसा नाही. अभियोगपक्षाने कायदयाप्रमाणे फिर्यादीचे संपुर्ण कथन संशयापलिकडे सिध्द करणे आवश्यक आहे. उपरोक्त सर्व कारणांमूळे हे न्यायालय या निष्कर्षाप्रत आले आहे की, संबंधीत दिवशी व वेळी आरोपी हा त्याचे ताब्यातील वाहन हे हयगयीने व बेदरकारपणे, रस्त्याचे परिस्थितीकडे व रहदारीकडे दुर्लक्ष करुन क्लीनरशिवाय चालवुन व पाठीमागून येणा-या लहान मुलीला न पाहता गाडी रिव्हर्स गिअरने पाठीमागे घेतली व त्यात सई उर्फ भक्ती ही मुलगी मयत झाली ही बाब संशयापलीकडे सिध्द होत नसून आरोपीने सदरचा गुन्हा केला आहे किंवा नाही याबाबत संशय निर्माण होत आहे. फिर्यादी व आरोपी हे एकाच गावातील त्यांनी त्यांचे भविष्यातील नातेसंबंध चांगले ठेवण्याच्या हेतून प्रस्तुत प्रकरणात सामंजस्याने तडजोड केली आहे. तडजोड केली असल्याने

त्याचा फायदा निश्चितच आरोपीच्या पक्षात जातो सबब, वरील सर्व विवेचनांचा विचार करता **<u>प्रश्नबिंदू क्रं.१ ते ५ चे उत्तर नकारार्थी नोंदवत आहे.</u>**

**<u>प्रश्नबिंदू क्रमांक ६ करीता</u>** –

**१७.** प्रश्नबिंदू क्रमांक १ ते ५ यांच्या विश्लेषणांती अभियोगपक्षतर्फे आरोपीविरुध्दचा गुन्हा संयापलिकडे सिध्द झाला नसल्यामुळे आरोपी प्रस्तुत गुन्हयातुन निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. प्रस्तुत प्रकरणात कोणताही मुद्देमाल जप्त नाही. सबब, प्रश्नबिंदू क्र.६ चे उत्तरार्थ पुढीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहेत–

## <u>आदेश</u>

१. आरोपी प्रदीप उर्फ बंडा धोंडीराम देसाई रा. घरपण, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर यांची भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३०४(अ), २७९,३३८ व मोटार वाहन कायदा कलम १८४,१३४(अ)(ब), २२३/१७७ अन्वये शिक्षापात्र गुन्हयातुन फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २५५(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे.

२. आरोपीचे वैयक्तीक व जामीन बंधपत्र रद्द करण्यात येत आहेत.

३. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ प्रमाणे पूर्तता करणेकामी रक्कम रु.१५,०००/– चे वैयक्तीक व त्याच रक्कमेचे जामीन बंधपत्र दयावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायदान कक्षात घोषीत करण्यात आला.)

Digitally signed by Vaishali Amol Lavand-Kokate
Date: 2026.05.12 18:17:48 +0530

(व्ही.ए.लावंड–कोकाटे)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
कळे–खेरीवडे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर

दिनांक १२.०५.२०२६
कळे–खेरीवडे.